ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख २ जुलै, १९५२ | अंक २७

## विविध माहिती

**ट्रॅक्टर्सनीं केलेली कामगिरी**—मध्य प्रदेशांतील ८५,००० एकर जमीन ट्रॅक्टर्सनीं नांगरण्यांत आली असें समजतें. अशी नांगरट करण्याची पद्धत वाढत असून राज्य सरकारनें ट्रॅक्टर्सच्या कारखान्यांकडे आणखी १०० ट्रॅक्टर्सची मागणी नोंदविली आहे.

**डॉलर्स देणारीं पिकें**—भारत सरकारनें गेल्या वर्षी डॉलर्स मिळवून देणाऱ्या पिकासंबंधीं सूचना करण्यासाठीं एक कमिटी नेमली होती. ही कमिटी आतां मद्रास, म्हैसूर, कूर्ग, मुंबई व ओरिसा ह्या राज्यांत दौरा काढणार आहे. मिरी, काजूबिया, सुठ, लेमन-ग्रास व हळद ह्यांच्या निर्यातीमुळें भारताला डॉलर्स मिळूं शकतात

**बद्रिनाथला विजेचा प्रकाश**—भारतामधील एक प्राचीन देवस्थान म्हणून बद्रिनाथाचें देऊळ प्रसिद्ध आहे. ह्या मंदिराच्या आवारांत आतां विजेचे दिवे चमकूं लागले आहेत. हें देऊळ १०,००० फूट उंचीवर असल्यानें तेथें वीज-निर्मिति होऊं शकणें कठिण आहे असें परकीय तज्ज्ञांचें सुद्धां मत होतें. पण एका हिंदी एंजिनिअरनें तें शक्य करून दाखविलें.

**घटनेचा संस्कृत तर्जुमा**—भारतीय सरकारनें भारताच्या घटनेचा संस्कृत तर्जुमा करण्यासाठी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांच्या नेतृत्वाखालीं एक पंडित-समिति नेमली होती. समितीनें आपलें काम पूर्ण केलें असून तर्जुम्याचें नांव 'भारतस्य संविधानम्' असें ठेवण्यांत आलें आहे. पुस्तकाचीं पृष्ठें ३०० असून किंमत फक्त २ रुपये ठेवण्यांत आली आहे.

**हैदराबादला बक्षिसाचा मान**—बंगलोर येथें म्हैसूर बागायत संघानें आंब्यांचें अ. भारतीय प्रदर्शन भरविलें होतें. ह्या प्रदर्शनांत उत्कृष्ट आंब्याबद्दलचें पहिलें बक्षीस हैदराबादला देण्यांत आलें.

**सायकलींचा नवा कारखाना**—कलकत्त्यापासून १४० मैलांवर कन्यापूर येथें सायकलींच्या एका नव्या कारखान्याचें उद्घाटन करण्यांत आलें. हा कारखाना ब्रिटिश व भारतीय कंपन्यांच्या सहकाराचें फळ असून त्यामधून दरवर्षी सुमारें १,००,००० सायकली तयार होतील. कारखान्याच्या भांडवलापैकीं ९३ टक्के भांडवल हिंदी आहे.

**संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें**—डॉ. ए. लक्ष्मीकांत मुदलिआर हे नकतेच युनेस्कोच्या बैठकीहून मद्रास येथें परत आले आहेत. संस्कृतमधील अभिजात ग्रंथांचीं भाषांतरें अनेक युरोपीय भाषांतून करण्यांत येणार असल्याचें त्यांनीं सांगितलें.

**पार्लमेंटच्या सभासदांसाठीं**—भारतीय सरकारनें पार्लमेंटच्या सभासदांची राहण्याची सोय करण्यासाठीं दिल्लींतील सदर्न अव्हेन्यू रस्त्यावर इमारत बांधण्याचें ठरविलें आहे. इमारतीसाठीं १७ लाख रुपये खर्च येईल आणि तींत ७२ सभासदांची सोय होईल. ही इमारत बहुधा पुढील वर्षी पुरी होईल.

**ग्रामीण भागांत विजेची सोय**—पतिआळा आणि पूर्व-पंजाब सरकारनें पुढील वर्षी ग्रामीण भागांना वीज-पुरवठा करण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं ४१ लाख रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत आली आहे.

**दिल्लीच्या परिसरांतील महाराष्ट्रीय**—विदर्भांतून लोकसभेवर निवडून आलेले दोन सभासद डॉ. पंजाबराव देशमुख आणि डॉ. खेडकर ह्यांनीं दिल्लीच्या आसपासच्या महाराष्ट्रीयांसंबंधीं माहिती गोळा करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. दिल्लीच्या आसमंतांत सुमारें ३५,००० महाराष्ट्रीय असावेत असा अंदाज आहे.

**भारताच्या रेल्वेवरील एंजिनें**—३१ मार्च १९५२ अखेर भारताच्या रेल्वेवर रुंद रुळावर धांवणारीं ५,२२५, अरुंद रुळावर धांवणारीं २,६७६ आणि निरुंद रुळावर धांवणारीं ३६३ रेल्वे-एंजिनें होतीं. पहिल्या प्रकारचीं १,२००, दुसऱ्या प्रकारचीं ८०० आणि तिसऱ्या प्रकारचीं १०० एंजिनें ४० वर्षांचीं जुनीं आहेत.

**अमेरिकेचा रहाणीचा निर्देशांक**—अमेरिकेंतील राहणीचा निर्देशांक पुन्हां गेल्या जानेवारीइतका चढला आहे. अन्न व जागाभाडें ह्या दोन बाबतींत वाढ झाल्यामुळें १९३५-३९ पर्यंत रहाणीचा जो सरासरी निर्देशांक होता त्याच्या १८९ टक्के वाढ गेल्या मे महिन्याच्या १५ तारखेपर्यंत झाली आहे.

**भारतीय पुस्तकांचें गिऱ्हाइक**—गेल्या वर्षीच्या जानेवारी ते सप्टेंबरपर्यंत सीलोननें भारताकडून ६,१७,६४८ रुपयांचीं पुस्तकें खरेदी केलीं. त्याच्या खालोखाल इंग्लंडनें ३,५९,८५५ रुपयांचीं पुस्तकें सीलोनला विकलीं. भारताकडून निर्यात झालेल्या पुस्तकांत संगीतावरील पुस्तकें अधिक होतीं असें समजतें.

**गुजरातमधील ग्रामोद्धार**—उत्तर गुजराथमधील विजापूर आणि कलोल जिल्ह्यांतील खेड्यांचा विकास करण्याची एक योजना मुंबई सरकारनें आंखली आहे. योजना पूर्ण होण्यास तीन वर्षे लागतील आणि तीवर ६५ लाख रुपये खर्च होतील. ग्रामोद्धार योजना सुमारें ५०० चौरस मैलांवर पसरलेली असेल.

## सरकारी पक्षपाताचा बळी ?

### एअर-इंडिया लि. चे चेअरमन, श्री. जे. आर. डी. टाटा, ह्यांचें वार्षिक सभेंतील भाषण

"वैमानिक वहातुकींच्या कंपन्यांची प्रगति आतां त्यांच्या प्रयत्नांवर अवलंबून राहिलेली नसून, कम्युनिकेशन्स खात्याच्या धोरणावर व नियंत्रणावर ती अवलंबून आहे. 'एअर इंडिया'च्या बाबतींत त्याचा परिणाम अत्यंत घातुक झालेला आहे. तीन प्रमुख कंपन्यांच्या कामाचे [ एअर इंडिया, एअरवेज ( इंडिया ) व डेक्कन एअरवेज ] १९५१ चे आंकड्यांची १९४८ च्या आंकड्यांशीं तुलना करणें बोधप्रद होईल. हे आंकडे सरकारमार्फतच उपलब्ध झालेले आहेत.

"एअर इंडियाच्या विमानांचा प्रवास ४५ लक्ष मैलांवरून ३८ लक्ष मैलांवर उतरला, तर डेक्कन एअरवेजच्या विमानांचा प्रवास ९,६५,००० मैलांवरून २२ लक्ष मैलांवर गेला. एअरवेजचा प्रवास ७,२५,००० मैलांचा ४० लक्ष मैल, म्हणजे पांच पट झाला. त्यामुळें, उतारूंची संख्या एअर इंडियाच्या बाबतींत १,१९,००० ची १,०५,००० झाली, तर डेक्कन एअरवेजच्या बाबतींत ती २७,००० ची ५०,००० व एअरवेजच्या बाबतींत १७,५०० चीं १,११,००० झाली. मालाच्या वहातुकीचे आंकडे ह्याहिपेक्षां आश्चर्यकारक आहेत. एअर इंडियाची वहातुक ५० लक्ष पौंडांवरून उतरून ४५ लक्ष पौंडावर आली. उलट, डेक्कन एअरवेजनीं ८,७०,००० पौंडांचे जागीं २५ लक्ष पौंड मालाची वहातुक केली. एअरवेजच्या मालवहातुकींत तर ४० पट वाढ झाली. ६,४५,००० पौंड ते २ कोटी, ५० लक्ष पौंड, अशी ती प्रगति आहे ! टपाल वहातुकींत वाढ अनुक्रमें १२६%, ४८०% व २,६००% आहे. सरकारनें एअरवेज स्वतःकडे घेतल्यावर तिला दिलेल्या टपालवहातुकींच्या देणगीचा तो परिणाम आहे.

"ह्यावरून दिसून येईल, कीं एअर इंडियाच्या मानानें इतर कंपन्यांची प्रगति कितीतरी मोठी आहे. ह्या दोन कंपन्यांच्या वापरांत असलेल्या विमानांचा प्रकार १९४२ पासून कायमच आहे, ह्यावरून त्यांच्या ह्या यशाचें कारण सरकारनें त्यांना राखून दिलेले जादा मार्ग व जादा प्रवासास परवानगी हेंच होय, हें स्पष्ट आहे. १९४६ सालीं अगदीं लहान असलेल्या एअरवेजनें आतां भारतांतील कंपन्यांत पहिला अनुक्रम मिळविला आहे, आणि गेलीं २० वर्षे वैमानिक वहातुकीसाठी खस्ता खाललेल्या एअर इंडियाची मात्र कुचंबणा झाली आहे. सरकारच्या ह्या तफावतीच्या धोरणामुळें एअर इंडियाच्या भागीदारांच्या गुंतवणुकीची किंमत तर कमी झाली आहेच, पण त्यांना १९४८ पासून डिव्हिडंडहि मिळूं शकलेलें नाहीं. कंपनीच्या नोकरांसाहि अधिक पगार व सुखसोई मिळणें अशक्य झालें. कंपनी-कंपनींत इतका भेदाभेद सरकारनें का करावा, ह्याची विचारणा करण्याची वेळ आतां आलेली आहे. सरकारी धोरणावर वैयक्तिक कंपन्यांचे व्यवहार किती अवलंबून असतात, हें सामान्य जनतेस कळणाराहि नाहीं. कोणत्या मार्गानें वहातुक करावी, आठवड्यांतून किती वेळां ती करावी, कोठें विमानें उतरवावींत, कोणत्या प्रकारचीं विमानें वापरावींत, दिवसा अथवा रात्रीं किती वाजतां निघावें, केव्हां पोचावें, दर कोणते आकारावे, इतकेच काय तर कधीं कधीं उतारूंना द्यावयाचे खाद्य पदार्थ कोठून घ्यावेत, ह्या सर्व बाबतींत सरकारच्या हुकुमाप्रमाणें वागावें लागतें. एअर इंडियाच्या वाढीस सरकारनें वाव दिला नाहीं, आणि तिच्या प्रगतीस पोषक अशा गोष्टींसाठी केलेले अर्ज त्यानें वेळोवेळीं फेटाळून लावले. एअर इंडियाच्या विरुद्ध किंवा इतर कंपन्यांच्या बाजूनें धोरण ठेवण्याचा बुद्धिपुरःसर हेतु नाहीं, असें डायरेक्टर जनरल ऑफ सिव्हिल एव्हिएशननें आश्वासन दिलें आहे, त्याबद्दल आम्हांला आनंदच वाटतो."

### एअर-इंडिया लि. चा ताळेबंद
### ( ३१-१२-१९५१ अखेर )

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | १,५०,००,००० | गुडविल, इ. | २०,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ५,७४,६३१ | भांडवली खर्च | १,४६,८१,७०६ |
| घसारा फंड | १,०६,६९,६७९ | येणीं | ५१,३३,९३७ |
| कर्ज (इं. बँकेचें) | २९,६२,५२१ | इनव्हेस्टमेंट ( एअर इंडिया इंटरनॅशनलचे शेअर्स ) | २०,००,००० |
| इतर देणीं | २८,३९,३१५ | | |

**आंतरराष्ट्रीय निधीसाठी जपानचें सोनें**—आंतरराष्ट्रीय-द्रव्य-निधीसाठी जपाननें १,७५,००,००० डॉलर्स किंमतीचें सोनें नुकतेच बोटीनें न्यूयॉर्कला पाठवून दिलें. युद्धानंतर सोनें घेऊन परदेशीं जाणारी ही पहिलीच जपानी बोट आहे.

### हिंदी बँकांच्या भारताबाहेरील कचेऱ्या

| देश | १९४९ | | १९५० | | १९५१ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | बँका | कचेऱ्या | बँका | कचेऱ्या | बँका | कचेऱ्या |
| ब्रह्मदेश | ५ | ६ | ५ | ७ | ५ | ८ |
| सिलोन | ३ | ३ | ३ | ३ | ३ | ३ |
| फ्रेंच इंडिया | २ | ३ | २ | ३ | २ | ३ |
| जपान | — | — | १ | २ | १ | २ |
| मलाया | ४ | ९ | ४ | ९ | ४ | १२ |
| पाकिस्तान | ४७ | १५० | ३८ | १२२ | ३९ | १०० |
| थायलंड | १ | २ | १ | २ | १ | २ |
| ग्रेट ब्रिटन | २ | २ | २ | २ | २ | २ |
| एकूण | | १७५ | | १५० | | १३२ |

# अर्थ

बुधवार, ता. २ जुलै, १९५२



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारतीय खनिजांचें संपत्तींत रूपांतर

### उज्वल भवितव्य

भारताच्या परदेशीय व्यापारांत कच्च्या मालाला–विशेषतः खनिजांना–अधिक महत्त्व येत चाललें आहे. सरकारनें खनिज संपत्तीच्या विकासाचा विस्तृत कार्यक्रम हातीं घेतला असून त्या-कामीं परकीय साह्यहि होत आहे. खनिज संपत्तीच्या मोठ्या साठ्यांचा शोध लावण्यांत आला असून अधिक संशोधन चालू आहे. देशाचा खनिज संपत्तीचा व्यवसाय भक्कम पायावर उभा करण्याचें भारतीय सरकारनें सुस्पष्ट धोरणहि जाहीर केलें आहे. भारत आणि ब्रिटन ह्यांच्यांत जो व्यापार चालतो त्यापैकीं बराच मोठा भाग खनिज संपत्तीनें व्यापलेला असतो. ब्रिटननें आयातावर बंधनें घालण्याचें ठरविलें असलें तरी भारत पौंडी गटांत असल्यामुळें भारताकडून ब्रिटनमध्यें आयात होणाऱ्या मालांत घट होण्याचें कांहीं कारण नाहीं. शिवाय, ब्रिटनला आपला शस्त्रास्त्र वाढीचा कार्यक्रम पुरा करण्यासाठीं कांहीं खनिजांची विशेषच जरूर आहे, हाहि लक्षांत ठेवलें पाहिजे.

भारतामधील खनिज संपत्तीच्या वार्षिक उत्पादनाची किंमत सुमारें ७५ कोटी रुपये होते. ह्या खनिजांपैकीं बराच मोठा वांटा पौंडाच्या कक्षेंतील देशांना आणि डॉलर्सच्या कक्षेंतील देशांना निर्यात केला जातो. भारतांत सांपडूं शकणाऱ्या खनिजांचें संशोधन व उत्पादन करण्याचें कार्य मुख्यतः जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिआकडे सोपविण्यांत आलें आहे. ही सर्व्हे १८५१ सालीं स्थापन झाली आणि तिची संवत्सरी १९५१ सालीं साजरी करण्यांत आली. ह्या सर्व्हेनें भारताच्या खनिज संपत्तीचा विकास घडवून आणण्यासाठीं एक पंचवार्षिक कार्यक्रम तयार केला आहे. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठीं १ कोटी रुपये खर्च येईल. देशांतील खनिज संपत्तीचा नकाशा तयार करण्यास प्रारंभ झाला आहे. विजेनें चालणारीं गिरमिटें आणि इतर आधुनिक यंत्रसामुग्री उपयोगांत आणून खनिजांचा शोध करण्याचें काम सुरू करण्यांत आलें आहे. ह्या कामीं ऑस्ट्रेलिआनें आपले एक तज्ज्ञ, मि. फिस्क ह्यांना मदतीसाठीं भारतांत पाठविलें आहे. जिऑलॉजिकल सर्व्हेनें आणि कांहीं खाजगी व्यक्तींनीं केलेल्या प्रयत्नांमुळें खनिज संपत्तीचे बरेच नवीन शोध लागले आहेत. युरेनिअम सांपडूं शकणारीं खनिजें ज्या थरांत आहेत असे कांहीं भूविभाग पूर्व-भारतांत आणि मध्य-भारतांत सांपडले असून भारताच्या ॲटॉमिक एनर्जी कमिशनतर्फे त्यांची अधिक तपशीलवार तपासणी करण्यांत येणार आहे. बिहारमध्यें युरेनिअम असणाऱ्या खनिजांचा शोध लागला होता; पण ह्या खनिजांतील 'युरेनिअम ऑक्साइड' चें प्रमाण फारच अल्प म्हणजे ०·१२ टक्केच आहे असें आढळून आलें. 'युरेनिम ऑक्साइड' असलेल्या अशा प्रत्येक धातुखंडास ९ रुपये रोख बक्षीस देण्याचें भारतीय सरकारनें जाहीर केलें आहे. ही बक्षिसाची योजना ५ वर्षें अंमलांत रहाणार आहे. 'समरस्काइट' नांवाच्या एका खनिजांत 'निओबिअम' आणि 'टँटॅलम' हीं द्रव्यें सांपडतात. ह्या खनिजांच्या प्रत्येक पौंडामागेंहि १॥ रुपयांचें बक्षीस जाहीर करण्यांत आलें आहे. युरेनिअम सांपडणारीं खनिजें शोधून काढण्यासाठीं भारतांत खूप प्रयत्न करण्यांत येत आहेत. पण तज्ज्ञ माणसें आणि आधुनिक संशोधन-साधनें ह्यांच्या अभावीं प्रगतीला अडथळा येत आहे.

'मोनाझाइट' ह्या खनिजाच्या बाबतींत भारत ह्या एकाच देशाकडे मक्तेदारी आली आहे. ह्या खनिजाची निर्यात करण्यास भारतीय सरकारनें मनाई केली असून स्वतःच त्याचें संस्करण करण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं द. भारतांत अलवाये येथें एक कारखाना काढण्यांत येत आहे. त्याचें काम जवळ-जवळ पूर्ण झालें आहे. ह्या कारखान्यांत दरवर्षी १,५०० टन 'मोनाझाइट' मिश्रित वाळूचा उपयोग करण्यांत येईल. भारत सरकार आणि त्रावणकोर--कोचीन संस्थान ह्यांनीं मिळून 'इंडिअन रेअर अर्थस' नांवाची एक कंपनी काढली आहे. ही कंपनी 'थोरिअम कॉपौंड्स' विकणार असून विक्रीच्या उत्पन्नामागें आपला खर्च चालविणार आहे. जमशेटपूर येथें 'बेरीलिअम' आणि तन्मिश्रित इतर धातू तयार करण्यासाठीं एक छोटासा प्रायोगिक कारखाना बांधण्यांत येत आहे. 'रेडिओ ॲक्टिव्ह आयसोटोपस' तयार करण्यासाठीं एक लहान अणु--शक्तीची भट्टीहि बांधण्याचा सरकारचा विचार आहे. वरील 'आयसोटोपस' आधुनिक वैद्यकशास्त्रांत मध्या बरेंच महत्त्व पावले आहेत. इतर अनेक देशांप्रमाणें भारताला गंधकाचा तुटवडा फारच भासतो. गंधक सांपडणारीं मूलची खनिजेंच भारतांत नसल्यामुळें भारतीय उद्योगधंद्यांना इंटर नॅशनल मटिरिअल्स कॉन्फरन्समार्फत मिळणाऱ्या गंधकावरच भागवावें लागतें. जिऑलॉजिकल सर्व्हेनें गंधक सांपडणाऱ्या खनिजांचा शोध करण्यास सुरवात केली असून ह्या कामांत मि. हिल्वर्न ह्या अमेरिकन तज्ज्ञाची मदत घेण्यांत आली आहे. आग्नेय आशिआंतील मागासलेल्या देशांना मदत करण्याची जी योजना प्रे. ट्रूमन ह्यांनीं आंखली आहे, त्या योजनेप्रमाणें मि. हिल्वर्न हे भारतांत आले असून त्यांनीं आपला अहवाल भारतीय सरकारला सादर केला आहे.

गेल्या वर्षी मुंबई राज्यांतील कारवारच्या डोंगराळ भागांत 'पायराइट्स' चा बराच मोठा साठा एका खाजगी संशोधकाला सांपडला. 'आयर्न पायराइट्स' ह्या मातींत ५१ टक्के गंधक, ५ टक्के निकेल आणि एक टक्का तांबें असतें. कारवारमधील साठ्याची तपासणी करण्यासाठीं भारतीय सरकारनें एका खनिज शास्त्रज्ञाची नेमणूक केली आहे. मद्रास राज्यांत पोलूर येथेंहि ही गंधक मिश्रित माती सांपडली आहे. अशा मातीचा उपयोग करून गंधक काढण्यांत आलें तर भारतांत तो अगदीं नवा असा प्रयोग होईल. 'मॅंगनीझ' धातूची निर्यात करून भारताला डॉलर्स मिळविता येतात. म्हणूनच कदाचित ह्या खनिजाच्या खाणींच्या

विकासाला अग्रस्थान देण्यांत आलें असावें. ब्रिटनमधील कारखान्यांना भारतामधील 'मँगेनीझ' ची माती अधिक पसंत पडते. कारण, तींत ही धातू मोठ्या प्रमाणांत सांपडते. १९२० सालापर्यंत भारताकडून ब्रिटनला मोठ्या प्रमाणावर 'मँगेनीझ' चा पुरवठा होत असे. त्या काळापर्यंत ब्रिटनच्या गरजेच्या ८४ टक्के गरज भारत भागवीत असे. हल्लीं मात्र ब्रिटनची २५ टक्के गरजच भारताकडून भागविली जाते. भारतीय सरकारनें १० लाख टन उत्तम प्रतीची 'मँगेनीझ' ची माती ब्रिटनला पुरविण्यास परवानगी दिली आहे. गेल्या वर्षाच्या एप्रिल ते ऑगस्ट ह्या पांच महिन्यांच्या काळांत भारताकडून ब्रिटनला अशी १४,८४३ टन माती पुरविण्यांत आली. मद्रास राज्यांत नैवेली येथें 'लिग्नाइट' जातीचा कमी प्रतीचा कोळसा सांपडला आहे. ह्या ठिकाणीं २०० कोटी टन 'लिगनाइट' सांपडेल असा अंदाज करण्यांत आला आहे. अमेरिकेचे एक तज्ज्ञ मि. पॉल इरिच हे खाणी उघडण्याच्या कामीं मदत करणार आहेत ह्या कोळशाचा उपयोग करून जळण आणि औद्योगिक शक्ति कशी निर्माण करतां येईल ह्यासंबंधीं इंटरनॅशनल बँकेचे एक प्रमुख अर्थशास्त्रज्ञ मि. बाइच ह्यांनीं मद्रास सरकारशीं वाटाघाटीहि केल्या आहेत. मद्रासमधील 'लिगनाइट' च्या खाणी १० वर्षांपूर्वीच चालू झाल्या होत्या; पण भूगर्भातील पाणी उफाळून वर आल्यामुळें त्या जवळ जवळ बंदच पडल्या आहेत.

त्रावणकोर–कोचीन राज्य सरकारनें आपल्या राज्यांतील खनिजांचा विकास करण्यासाठीं १० लाख रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. ह्या राज्यांतच फक्त 'इलमेनाइट' खनिज सांपडतें. लवकरच ७०,००० टन 'इलमेनाइट' उत्पादन करतां येईल असा भरंवसा राज्य सरकारला वाटत आहे. मुंबई राज्यांतील रत्नागिरीजवळहि 'इलमेनाइट' चे सांठ सांपडले आहेत. दोन्ही ठिकाणच्या खनिजमिश्रित वाळूचा उपयोग करण्यांत आला तर भारत 'टिटॅनिअम' च्या उत्पादनांत पहिल्या अनुक्रमाचें राष्ट्र ठरेल असा संभव आहे. चायना क्ले, ग्रॅफाइट, शेल डिपॉझिट, कोरल लाइमस्टोन व तांबें ह्या खनिजांसाठींहि कसून संशोधन करण्यांत येत आहे. भारतांत परकीय भांडवल मोठ्या प्रमाणावर गुंतविण्यासंबंधीं भारतीय सरकार, खाजगी भांडवलदार व परदेशीय भांडवलदार ह्यांनीं एकमेकांत बरींच चर्चा केलेली आहे. खनिज–संपत्तीचा विकास करण्याच्या दृष्टीनें एक महत्त्वाचा करार नुकताच करण्यांत आला आहे. हा करार भारतीय सरकार आणि अमेरिकेंतील ब्रेनार्ड इंटर नॅशनल कंपनी ह्यांच्यांत झाला आहे. अमेरिकन कंपनीनें दरवर्षी २५,००० टन लोखंड–मिश्रित मँगेनीझची माती गाळूं शकेल असा एक कारखाना उघडण्याचें कबूल केलें आहे. ह्या कारखान्याला १० लाख डॉलर्स भांडवल लागेल. पेट्रोल शुद्ध करण्याचे कारखाने काढण्यासंबंधीं भारतीय सरकारचीं बोलणीं झालीं आहेत. ह्या कारखान्यांना प्रत्येकीं १५० कोटी रुपये भांडवल लागेल.

एकंदरींत, येत्या कांहीं वर्षांत भारतांत बऱ्याच प्रकारचे खनिज विषयक धंदे निघतील असें दिसतें. विपुल खनिज–संपत्ति, तिचा विकास करण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम व परकीय तज्ज्ञांची मदत, इतक्या गोष्टी एकत्र आल्यावर ह्या भारतीय धंद्यांचें भवितव्य उज्ज्वल होण्यास कांहीं हरकत राहूं नये. भारताचे खनिज–विषयक उद्योगधंदे भरभराटीस आले तर फक्त भारताचाच फायदा होणार आहे असें नसून, ब्रिटन, अमेरिका व इतर बरींच राष्ट्रें ह्यांनाहि थोडा बहुत लाभ होईल असें वाटतें.

## ट्रस्ट ऑफ इंडियाची सर्वांगीण प्रगति

ट्रस्ट ऑफ इंडिया अॅशुअरन्स कंपनी लि. नें १९५१ मध्यें ११,६०,४१४ रु. चें नवें काम पुरें केलें. लाइफ अॅशुअरन्स फंडांत १,४७,८५८ रु. ची भर पडून तो आतां १५,४५,३७० रु. झाला आहे. रिन्युअल खर्चाचें प्रमाण १५% पेक्षां कमी, म्हणजे मूल्यमापनांतील तरतुदीपेक्षां कमीच, पडलें आहे. इन्व्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंडांत अहवालाचे वर्षी ६४,९०० रु. टाकण्यांत आले. तो फंड आतां ८६,५०० रु. झाला आहे. ३१–१२–१९५० अखेरच्या मूल्यमापनांत ७२,१७४ रु. वाढावा आढळून आला. १९४८ ते १९५० ह्या तीन वर्षांसाठीं दरसाल दर हजारीं अनुक्रमें १० रु. व ८ रु. बोनस वाटण्यासाठीं ६६,७६१ रु. बाजूस काढून भागीदारांसाठीं ५,४१३ रु. उपलब्ध झाले. त्यांतून प्रत्येक भागास २ रु. ८ आ ( म्हणजे २½% ) डिव्हिडंड देण्याचें ठरलें. ताज्या इन्शुअरन्स बुकप्रमाणें, भारतांतील २३८ कंपन्यांपैकीं फक्त २५ कंपन्यांनीं असा बोनस जाहीर केला असून फक्त २० कंपन्यांनीं डिव्हिडंड दिलें आहे. "मूल्यमापनांत दिसून आलेली परिस्थिति अत्यंत उत्तेजनकारक आहे. भक्कम पायावर काम वाढविण्याकडे तिचा उपयोग जरूर करून घ्यावा. चांगल्या तऱ्हेनें चालविलेल्या ह्या कंपनींत विमेच्छूंचे हितसंबंध पूर्णपणें सुरक्षित आहेत; इतकेंच नव्हे तर भारतांतील कांहीं सुव्यवस्थित कंपन्यांच्या तोडीइतकें व्याज त्यांना ह्या कंपनींतील त्यांच्या बचतीवर पडूं शकेल" असा अभिप्राय अॅक्चुअरी श्री. के. ए. पंडित, बी. एससी., एफ्. आय. ए. ( लंडन ) ह्यांनीं आपल्या रिपोर्टांत व्यक्त केला आहे.

### अध्यक्ष, श्री. जगन्नाथ महाराज पंडित, ह्यांचा आढावा

कंपनीची वार्षिक सभा १५ जून रोजीं तिचे अध्यक्ष, श्री. जगन्नाथ महाराज पंडित, ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. त्यावेळीं भाषण करतांना त्यांनीं कंपनीच्या प्रगतीचा व सुस्थितीचा कांहीं तपशील दिला. डेली प्रिमिअम योजनेप्रमाणें पॉलिसी देण्यास कंपनीनें पुनः प्रारंभ केला आहे. कंपनीच्या लाइफ फंडापैकीं ६५% रक्कम ( १०,१३,६०८ रु. ) सरकारी रोख्यांत आहे. सरकारी रोख्यांचे भाव उतरले, तरी त्याचा विमाकंपन्यांवर दुष्परिणाम होत नाहीं. कारण त्यांना रोखे विकण्याची पाळी येत नाहीं; उलट, त्या नवे नवे रोखे विकत घेत जात असतात, आणि त्यांना ते पडीक किंमतीस मिळूं शकतील. दीर्घकालीन दृष्टीनें पाहिलें, तर ह्यापुढील त्यांच्या गुंतवणुकीवर विमाकंपन्यांना ज्यास्त दरानें व्याज सुटून त्यांना तें फायदेशीर होईल. कंपनीचे जे भागीदार कंपनीकडून परस्पर विमा घेतील त्यांना हप्त्यांमध्यें १०% सूट मिळण्याची सवलत कंपनीनें ठेवली आहे आणि ती सवलत कंपनीच्या नोकरवर्गासहि मिळते. हप्त्यांचे माफक दर, बोनसचा चांगला दर, भागीदारांस १०% रिबेट, ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेतां, विमेच्छूंना ह्या कंपनींत विमा उतरणें फायद्याचें होईलच, परंतु भागीदारांना त्यांच्या भागाची भांडवली किंमत भरून येऊन त्यावर पुनः डिव्हिडंड मिळत राहील, इतका त्यांत नफा आहे.

ट्रस्ट ऑफ इंडियाची गेलीं १७ वर्षें सतत जोपासना करून तिला आजचें स्थान प्राप्त करून देणारे तिचे संस्थापक–मॅनेजर श्री. व्ही. एच्. देशमुख, ह्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. प्रमुख कंपन्यांच्या तोडीचें स्थैर्य व नफा विमेदारांना उपलब्ध करून देण्याचें त्यांचें धोरण यशस्वी झालें आहे आणि कंपनीच्या कामांत आणखी मोठी वाढ करण्यासाठीं ह्या परिस्थितीचा उपयोग करून घेण्याची अॅक्चुअरींची सूचना अगदीं योग्य आहे. डायरेक्टरबोर्डाचें सहकार्याचें धोरणहि अनुकरणीय आहे.

## चेक कॅश करतांक्षणींच विमा करार पुरा झाला

### कलकत्ता हायकोर्टाचा ताजा निवाडा

जानेवारी, १९३९ मध्यें, हिंदुस्थान को. इन्शुअरन्स सोसायटी लि. चे ऑर्गनायझर, श्री. एन. पी. दास, ह्यांच्या सांगण्यावरून वादींच्या विमेच्छु बंधूनें १०,००० रु. ची विमा-पॉलिसी घेण्याचें तोंडी मान्य केलें. कंपनीच्या डॉक्टरानें त्याची वैद्यकीय तपासणी केली. तपासणीनंतर ऑर्गनायझरनें त्यास सांगितलें, "तुझी प्रकृति फर्स्ट क्लास आहे. तेव्हां, ताबडतोब प्रपोजल फॉर्म भरून सहामाही हप्ता दिला, कीं कंपनी तुझा विमा पत्करून तात्काळ पॉलिसी देईल." त्याप्रमाणें प्रपोजल फॉर्म भरण्यांत आला आणि कंपनीच्या नांवानें सहामाही हप्त्याचा २९५ रु १० आ. चा चेक देण्यांत आला. ऑर्गनायझरनें, "हिंदुस्थान को. इं. सो. कडे पाठविलेल्या प्रपोजलच्या सहामाही हप्त्याचे आगाऊ पैसे पोचले" अशी पावती विमेच्छुस दिली. हप्त्याचा चेक १८ जानेवारी, १९३९ रोजीं बँकेंत दाखल केला जाऊन कॅश करण्यांत आला. १ फेब्रुवारी १९३९ रोजीं विमेदार न्युमोनियानें मरण पावला, तेव्हां वादीनें १०,००० रु ची विमा कंपनीवर डिक्री मिळविली. मूळ कोर्टांत विमा कंपनीनें सांगितलें, कीं एन. पी. दास हा कटक येथील फक्त ऑर्गनायझर होता. त्याला प्रपोजल घेण्याचा किंवा हप्त्याची रक्कम स्वीकारण्याचा अधिकारच नव्हता. कंपनीकडे प्रपोजल व चेक हीं दाखल झाल्यावर, चेकचे पैसे विमेच्छूच्या सस्पेन्स अकौंटमध्यें ठेवण्यांत आले. प्रपोजल मंजूर झालें असतें, तर पैसे हप्त्याच्या पोटीं जमा करण्यांत आले असते. प्रस्तुत प्रकरणीं, विमेच्छु हा वयाच्या ४४ व्या वर्षी मोठ्या रकमेचा विमा उतरीत आहे, म्हणून कंपनीच्या सेक्रेटरीला जरा अधिक चौकशी करावीशी वाटली आणि ऑर्गनायझरकडे त्याचें वय, संवयी, इत्यादींबाबत तपशील मागणारें पत्र ३१ जानेवारी रोजीं पाठविण्यांत आलें. हा रिपोर्ट कंपनीस मिळण्यापूर्वीच, विमेच्छु मृत्यु पावला. थोडक्यांत म्हणजे, प्रपोजल मंजूर करण्यांत आलें नव्हतें व हप्ताहि स्वीकारलेला नव्हता, असें कंपनीचें म्हणणें होतें. कोर्टानें, करार पुरा झाला असें ठरवून डिक्रीचा हुकूम केला.

कलकत्ता हायकोर्टाकडे अपील करण्यांत आलें, तेव्हां एकच महत्त्वाचा मुद्दा चर्चिला गेला. तो म्हणजे, चेक कॅश केल्यानें प्रपोजल मंजूर केलें, असा अर्थ होतो काय?

"चेक कॅश केल्यानें प्रपोजल मंजूर होतें असें ठरलें, तर ३१ जानेवारी १९३९ च्या पत्रानें, विम्याचा करार संपुष्टांत येऊं शकत नाहीं. प्रपोजल, मेडिकल रिपोर्ट, फ्रेंड्स रिपोर्ट, हे सर्व कंपनीजवळ होते आणि त्यांची कंपनीस दखल असतांना कंपनीनें चेक कॅश केला. ऑर्गनायझरला हप्त्यांच्या रकमेचा चेक स्वीकारण्याचा अधिकार नाहीं हें तिला माहीत होतें. तेव्हां, त्यानें चेक पाठवला तो हप्त्यांचा कसा असूं शकेल? तो हप्त्याच्या रकमेचा आहे किंवा नाहीं हें फक्त कंपनीच ठरवूं शकेल. कंपनीनें प्रपोजल मंजूर केलें नाहीं, किंवा तें मंजूर करण्याचा तिचा बेत नव्हता, तर तिनें चेक कॅश केलाच कां मुळीं? ह्या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर कंपनीकडून मिळालें नाहीं. विमेच्छूनें प्रपोजलबरोबर चेक पाठवला, ह्याचा मथितार्थ असा, कीं मी प्रपोजलबरोबर सहामाही हप्ता भरीत आहें. ऑर्गनायझर तो स्वीकारूं शकत नाहीं, परंतु कंपनी स्वीकारूं शकते. माझें प्रपोजल मंजूर केलें, तर चेक कॅश करा. म्हणजे, मंजुरी विमेच्छूला कळविण्याची आवश्यकता नाहीं, असा त्याच्या कृतीचा भाव होता. प्रपोजल मंजूर केल्याचें पत्र विमेच्छूला जाण्याचें सबब प्रयोजन नव्हतें. ज्यावेळीं चेक कॅश केला, त्याचवेळीं करार पुरा झाला. कंपनी अगर विमेच्छु ह्यांपैकीं कोणीहि मागाहून कांहींहि पत्र लिहिलें तरी त्यानें करार बदलूं शकणार नाहीं. ३१ जानेवारीच्या पत्रानें करार रद्द होऊं शकत नाहीं. म्हणून कंपनी विम्याची रक्कम देण्यास बांधलेली आहे." असा हायकोर्टानें निवाडा केला.

SAVE to help yourself and the NATION
WITH THE

HOME SAFE
THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
*Branches:* Dadar, Mahim, Poona & Belgaum

## नॅशनल सेव्हिंग्ज बँकेच्या भांडवलाची पुनर्रचना

"नॅशनल सेव्हिंग्ज बँकेकडे भारताच्या फाळणीपूर्वी सुमारें ५ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या, त्या १९५१ अखेर ८७½ लक्ष रुपयांवर आल्या आहेत. फाळणीमुळें बँकेस बराच धक्का बसला. बँकेच्या माणिक चौक, अहमदाबाद शाखेंत गेल्या वर्षी ६ लक्ष, ४२ हजार रुपयांची अफरातफर झाली त्याचाहि प्रतिकूल परिणाम झाला. मार्चमधील मंदी त्याच्याच पाठोपाठ आली. त्या सर्वांतून बँक सुखरूप बाहेर पडली, आणि आतां परिस्थिति सुधारत आहे" असें बँकेचे चेअरमन, श्री. एन. सी. खोसला ह्यांनीं वार्षिक सभेंत ता. २८ जून रोजीं सांगितलें बँकेचें दुसऱ्या बँकेशीं एकत्रीकरण करण्याचा यत्न करण्यांत आला. परंतु तें भागीदारांच्या हिताचें होणार नाहीं असें आढळून आल्यावर तो यत्न सोडून देण्यांत आला. म्हणून, बँकेच्या भांडवलाची पुनर्रचना—५० रु. चा शेअर १२ रु. ८ आ. किंमतीचा आहे असें मानणें—सुचविणें जरूर झालें. हा किंमतींतील उतार भागीदारांना फार मोठा वाटून, त्यांनीं ५० रु. चा शेअर ३५ रु. चा करण्यास मान्यता दिली. ह्याचा अर्थ, ९२ लक्ष रुपयांचें अधिकृत भांडवल आतां ६४ लक्ष रु. झालें व वसूल भांडवल ४६ लक्ष रु. चें ३२ लक्ष रुपयांवर आलें. ह्या दुरुस्तीसह भांडवलाची घट पुरेशा मतांनीं मंजूर झाली. १९५१ अखेरच्या आकड्यांप्रमाणें, बँकेचें वसूल भांडवल ४६ लक्ष रु., ठेवी ८७½ लक्ष रु., इतर बँकांकडून घेतलेलें कर्ज २६½ लक्ष रु., अशीं देणीं असून जिंदगीच्या बाजूस २९½ लक्ष रु. रोख व बँकांत, ५०½ लक्ष रु. इनव्हेस्टमेंट, ६० लक्ष रु. कर्जे, अशा प्रमुख बाबी आहेत. अफरातफरीचे ६ लक्ष, ४२ हजार रुपये तरतूद न केलेले आहेत.

### श्री. वा. पुं. वर्दे

श्री. वा. पुं. वर्दे यांचें नांव, इंटरनॅशनल ॲग्रिकल्चरल क्रेडिट कॉन्फरन्स अमेरिकेंत कॅलिफोर्नियांत ४ ऑगस्टला सुरू होणार आहे, त्याकरतां हिंद सरकारतर्फे प्रतिनिधि म्हणून सुचविलें गेलें आहे.

### श्री. एच. पी. मोदी

श्री. एच. पी. मोदी हे सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या चेअरमनचे जागीं पुन: आले आहेत.

## जी. जी. दांडेकर मशिन वर्क्स लि.

दांडेकरवाडी, भिवंडी ( जि. ठाणें )

**भागीदार, ठेवीदार व मित्राइक ह्यांच्या माहितीसाठी पत्रक**

गेल्या कांहीं महिन्यांतील मंदीचा, भांडवली स्वरूपाच्या यंत्र-सामुग्रीच्या कारखानदारांवर प्रतिकूल परिणाम झालेला आहे. किर्लोस्कर आणि कूपर ह्यांच्यासारख्या कारखानदारांसहि मंदीची झळ लागली असतांना, आपला कारखाना अपवाद ठरणें अशक्य आहे. आपलें मुख्य उत्पादन स्वयंपूर्ण राइस मिलचें. त्यासाठीं भांडवली खर्च बराच लागतो. त्यांची वाढ संख्येचे दृष्टीनें होण्यास वाव जरा कमीच राइस मिल्सवरील सरकारी नियंत्रणांची अडचणहि आहेच. ह्या सर्वांतून बाहेर पडण्यासाठीं आपल्या डायरेक्टरांनीं ऑइल एक्स्पेलर्सच्या उत्पादनाची प्राथमिक तयारी म्हणून स्टील फर्नेस व टाटांकडून स्वतंत्र वीजपुरवठा घेण्यासाठीं स्वतःचें सबस्टेशन उभारण्याचा योग्य असा निर्णय घेतला.

तयार राइस मिल्स व फ्लोअर मिल्स ह्यांचा स्टॉक वाढत चाललेला असून, गेल्या डिसेंबरपासून नव्या ऑर्डरी येणें बंद झाल्यामुळें, डायरेक्टरांनीं कंपनीचा आर्थिक भक्कमपणा कायम राखण्यासाठीं नवें उत्पादन बंद ठेवण्याचें ठरविलें. बोर्डानें एक सबकमिटी नेमून तिचेकडे परिस्थितीचें निरीक्षण करण्याचें व उत्पादनास योग्य वेळीं पुनः प्रारंभ करण्याची शिफारस करण्याचें काम सोपविलें आहे. मध्यंतरीच्या काळांत वर्कशॉप चालू स्थितींत ठेवण्याचें व पुनः कामास लागण्याच्या तयारींत ठेवण्याचें काम मॅनेजिंग एजंटस् करणार आहेत, आणि कारखान्याचें संरक्षण, यंत्रसामुग्रीची दुरुस्ती, इत्यादींसाठीं जरूर तो कमींत कमी नोकरवर्ग ठेवण्यांत येणार आहे. कारखाना बंद केल्यानें नोकरवर्गाचे हाल होतील ह्या जाणीवेनें तो बंद करण्यास डायरेक्टर अत्यंत नाखुष होते, परंतु भागीदारांच्या हिताचे पालक ह्या दृष्टीनेंहि त्यांना पहाणें जरूर होतें. कंपनीचें आर्थिक बळ कायम राखलें तर उत्पादन पुनः सत्वर सुरू करणें सुलभ जाईल, हें ओळखून डायरेक्टरांनीं १ जुलै, १९५२ पासून कारखाना बंद करण्याचें नाइलाजानें ठरविलें.

ज्यास्त दरानें डिव्हिडंड वाटण्याचा मोह डायरेक्टरांनीं सतत टाळला आहे आणि कंपनीचें आर्थिक स्थैर्य वाढविण्याकडे लक्ष दिलेलें आहे, हें सालोसालच्या वार्षिक ताळेबंदांवरून भागीदारांच्या लक्षांत आलेलेंच असेल. गेस्ट हाउस बांधण्यांत किंवा मॅनेजिंग एजंटस् आणि कंपनीचे अधिकारी ह्यांचेसाठीं बंगले बांधण्यांत डायरेक्टरांनीं पैसे अनुत्पादक रीत्या अडकवलेले नाहींत. प्लँट व मशिनरी ह्यांतच सर्व भांडवली खर्च असून, वेगवेगळे रिझर्व्हज् मुख्यतः सरकारी रोख्यांत गुंतविलेले आहेत. त्यांचे तारणावर बँकांकडून सोप्या अटींवर केव्हांहि जरूरीप्रमाणें कर्ज घेतां येतें. तथापि, तात्पुरत्या ओव्हरड्राफ्टखेरीज इतर कारणांसाठीं बँकांकडून कर्ज घेणें बोर्डाच्या धोरणास धरून नाहीं.

एकी हेंच बळ. आपणां सर्वांकडून आम्हीं पूर्वीप्रमाणेंच सहकार्याची व मदतीची अपेक्षा करतों व आमचें निष्ठावंत सहकार्य मिळत राहील अशी ग्वाही देतों. राइस मिल्स, फ्लोअर मिल्स, इत्यादींचे कित्येक पूर्ण नग डिलिव्हरीसाठीं तयार आहेत आणि डिलिव्हरीसाठीं ऑर्डरी पूर्ववत् नोंदण्यांत येत आहेत.

दांडेकरवाडी, जि. ठाणें, २३-६-१९५२ } जी. जी. दांडेकर मशिन वर्क्स लि.


## ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.**

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंदुके.


सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

वाय. एस. जोशी
ॲ. मॅनेजर.

## मुंबई राज्याचें अंदाजपत्रक

( लक्ष रुपये )

| वर्ष | उत्पन्न | खर्च | वाढावा | तूट |
|---|---|---|---|---|
| १९५०–५१ (पक्के हिशेब) | ६४३०·८६ | ६४३७·१८ | ... | ६·३२ |
| १९५१–५२ (दुरुस्त) | ६१०८·०४ | ६२२६·३९ | ... | ११८·३५ |
| १९५२–५३ (अंदाज) | ६७५३·०९ | ६७५०·९० | २·१९ | ... |

### करवाढीचें स्वरूप

नवीन करवाढीचें उत्पन्न ४७० लक्ष रुपये येईल असा अंदाज आहे. इन्कमटॅक्सच्या उत्पन्नांतील वाटा वगळला तर मुंबई राज्याच्या उत्पन्नाच्या मुख्य बाबी विक्रीकर व जमीनमहसूल ह्या होत. सध्यां शेवटचें गिऱ्हाईक माल घेतें, तेव्हां विक्रीकर वसूल केला जातो. आतां यापुढें मालाची विक्री होईल त्या प्रत्येक वेळीं रुपयाला १ पैसा प्रमाणें कर घेतला जाईल. पूर्वींचा दर २ पैसे आहे. विक्रीकरांतील वाढीमुळें २॥ कोटी रुपये मिळतील. जमीनमहसुलावरील सरचार्ज ९५ लक्ष रुपये येईल. मोटार-करांतील वाढीपासून ५० लक्ष रुपये मिळतील. पेट्रोल विक्रीकरांतील वाढ ७५ लक्ष रुपये मिळवून देईल. अर्बन इम्मुव्हेबल प्रॉपर्टी कराचा दर कमी केल्यामुळें २० लक्ष रु. उत्पन्न घटेल. म्हणजे, एकूण ४ कोटी, ५० लक्ष रुपये जादा उत्पन्न मुंबई राज्याच्या तिजोरींत जाईल. बिगर–शेतसारा सरसकट २५% वाढणार आहे.

### दर माणशीं करभार (१९५१–५२ च्या अंदाजपत्रकाप्रमाणें)

भारतांतील सर्व राज्यांत मुंबई राज्यामध्यें करभार अधिक आहे हें खालील तक्ता स्पष्ट करील:—

( मध्यवर्ती सरकारनें वसूल करून दिलेल्या करांचेसह )

| | रु. | आ. | पै |
|---|---|---|---|
| मुंबई | १२ | १२ | १० |
| प. बंगाल | ११ | १० | १ |
| मद्रास | ७ | १२ | ९ |
| मध्यप्रदेश | ७ | ८ | ११ |
| आसाम | ७ | ७ | ४ |
| पंजाब | ७ | १ | ४ |
| उ. प्रदेश | ७ | १ | ४ |
| बिहार | ५ | ३ | १० |
| ओरिसा | ४ | १५ | १ |

### पोलादाचें उत्पादन व त्याचा वाटणीप्रमाणें उठाव

हिंदी कारखान्यांत १९५१ सालीं एकूण १०,७३,६०० टन पोलाद तयार झालें. वेगवेगळ्या खात्यांसाठी व उद्योगधंद्यांसाठी ११,९३,३९२ टन पोलाद राखून ठेवण्यांत आलें. परंतु त्यांपैकीं फक्त ८,९५,०८६ टन प्रत्यक्ष उचलण्यांत आलें. अपेक्षित उत्पादनावरून ही वाटणी आगाऊ केली जाते व प्रत्येक तिमाही-नंतर जरूर तो बदल तींत केला जातो. निर्गतीसाठी ३९,८८० टनांची तरतूद केली होती; प्रत्यक्ष निर्गत ६,९०३ टन झाली.

### साखरेची निर्गत करण्यास परवानगी

३० जून, १९५२ अखेरपर्यंत ५०,००० टन साखरेच्या निर्गतीस परवानगी दिली जाईल, असें भारत सरकारनें गेल्या एप्रिलमध्यें जाहिर केलें होतें. ३१ ऑक्टोबर १९५२ अखेर मुदत आतां वाढविण्यांत आली आहे.

### साठे बिस्किट अँड चोकोलेट कं. लि.

वरील कंपनीनें ३१ मार्च, १९५२ अखेर. संपलेल्या वर्षी चोकोलेट व बिस्किटें ह्यांची २७,६०,८७३ रुपयांची विक्री केली व ६४,३०० रु. घसारा काढून आणि १,१५८ रु. शेअर विक्रीच्या कमिशनची रक्कम लिहून टाकून १,६२,०९० रु. निव्वळ नफा मिळविला. वेगवेगळ्या फंडांत रकमा टाकून, आर्डिनरी भागांवर ६% करमाफ डिव्हिडंड देण्याची शिफारस बोर्डानें केली आहे. कंपनीनें विक्रीस काढलेले २० लक्ष रुपयांचे सर्व भाग खपले आहेत. चोकोलेट खात्यासाठी गेल्या वर्षी मागविलेलीं बहुतेक सर्व यंत्रें येऊन उभारण्यांतहि आलीं आहेत. कंपनीच्या कारखान्याचा बिस्किट विभाग व गोडाऊन बांधून झालें आहे व एअरकंडिशनिंग प्लँट बसविण्यांत आलें आहे, तें नीट काम देत आहे. बिस्किटाच्या यंत्रसामुग्रीची कार्यक्षमता तपासून पाहिली आहे, परंतु विजेवरील निर्बंधांमुळें त्यावर उत्पादन सुरू करणें तूर्त शक्य झालेलें नाहीं. हे निर्बंध उठले म्हणजे तें सुरू करतां येईल साठे कंपनीनें केलेली प्रगति व वाटलेला नफा भागीदारांना समाधानकारकच वाटेल. ताळेबंद ३८ लक्ष रुपयांचा आहे. कंपनीची वार्षिक सभा २० जुलै रोजीं भरणार आहे.


**THE SATHE BISCUIT & CHOCOLATE CO., LTD., POONA 2.**

# NOTICE

NOTICE is, hereby, given that the Third Annual General Meeting of the Share-holders of the Sathe Biscuit and Chocolate Co., Ltd., will be held on **Sunday, the 20th July 1952,** at the Registered Office of the Company ( 820, Bhavani Peth, Poona 2 ), at **4 P. M. ( S. T. )** to transact the following Business :—

1. To receive and adopt the report of the Directors, Audited Balance Sheet and Profit and Loss Account for the year ended 31st March 1952.
2. To sanction the declaration of Dividend.
3. To elect Directors in the place of three Directors, namely, Shri. P. B. Ganpule who retires by rotation under Art. 60 and Shri. J. G. Jadeja and R. B. G. G. Shembekar who retire under Art. 52 of the Articles of Association of the Company. All the three retiring Directors are eligible for re-election and have offered themselves for the same.
4. To appoint Auditors and fix their remuneration.
5. To transact such other business as may be allowed by the Chairman.

By the Order of the Board
For Sathe Food Industries, Ltd.

Poona 2.
17th June 1952.

G. R. Sathe,
Chairman,
Managing Agents.

*N. B.*—The Transfer Books and the Register of Members of the Company will remain closed from 9th July to 23rd July 1952 ( both days inclusive ).

## आग्नेय आशियांतील देशांचा परराष्ट्रीय व्यापार

१९५१-५२ च्या परराष्ट्रीय व्यापारांत हिंदला १५६ कोटी रु. हून जास्त तूट आली आहे. या तुटीचा विचार करतांना आग्नेय आशियांतील बहुतेक सर्वच देशांना गेल्या वर्षापासून परराष्ट्रीय व्यापारांत प्रतिकूल तफावत येत असून या बाबतींत फक्त थायलंड व जपान हे अपवाद आहेत असें आढळतें. उत्तर बोर्नियो, ब्रह्मदेश, सीलोन, इंडोनेशिया, मलाया, पाकिस्तान व फिलिपाइन्स या देशांना १९५१ च्या तिसऱ्या तिमाहींत व्यापारांत तूट येऊं लागली. परराष्ट्रीय व्यापाराची स्थिति बदलण्याचें मुख्य कारण म्हणजे आंतरराष्ट्रीय युद्ध परिस्थिति सुधारल्यामुळें व कोरियाचे बाबतींत तह घडून येईल या आशेमुळें वरील देशांच्या विक्री-मालाचें गिऱ्हाईक कमी झालें. यापुढें शांतता पूर्णपणें निर्माण झाली नाहीं व युद्धतयारीचे प्रयत्न हळू हळू चालू राहिले तरीहि कच्च्या मालांच्या उतरूं लागलेल्या किंमती वाढणार नाहींत. कारण, युद्ध तयारी करणाऱ्या देशांनीं कच्च्या मालाची सांठेबाजी भरपूर केलेली आहे व मागणीचा ताण कमी झाल्यामुळें कच्च्या मालाच्या किंमती कदाचित स्थिर राहातील किंवा आणखी उतरतीलहि. परंतु याचवेळीं युद्ध तयारीचे प्रयत्न चालू असल्यामुळें पक्क्या मालाच्या किंमती मात्र वाढण्याचा संभव आहे. या वातावरणाचा परिणाम हिंदसह आग्नेय आशियांतील देशांच्या परराष्ट्रीय व्यापारावर प्रतिकूल तफावत निर्माण करणारा होईल.

हिंदमध्यें प्रतिकूल तफावत येण्याला एक महत्त्वाचें कारण तयार सुती कापडाची निर्गत कमी झाली हें आहे. रबर, कथील, खोबरें व खोबरेल तेल, कापूस व ताग यांच्या किंमती उतरल्यामुळें वर उल्लेखिलेल्या इतर बहुतेक सर्व देशांच्या परराष्ट्रीय व्यापारांत घट आली. याचवेळीं उत्तर बोर्नियो, सीलोन, इंडोनेशिया, मलाया व फिलिपाईन्स या देशांच्या निर्गत मालाच्या किंमती उतरल्या. परंतु त्यांना आयात कराव्या लागणाऱ्या मालाच्या किंमती वाढल्या व त्याचा परिणाम परराष्ट्रीय व्यापारांत प्रतिकूल तफावत येण्यांत झाला. मलाया व इंडोनेशियांतून रबराची निर्गत कमी प्रमाणांत झाली. चहाचा खप जवळ जवळ कायम राहिला, परंतु किंमतींत उतार दिसून आला. हिंद व पाकिस्तान यांच्या कापसाला मागणीहि जागतिक पीक सुधारल्यामुळें कमी प्रमाणांत आली.

### विदेशी कंपन्यांच्या सोईसाठीं कंपनी कायद्यांत दुरुस्ती

कंपनी कायद्यांत दुरुस्ती करणारें एक बिल अर्थमंत्र्यांनीं पार्लमेंटांत मांडलें आहे. कायद्यांतील ९१-ब कलमांतील निर्बंधांतून विदेश कंपन्यांनीं भारतांत स्थापन केलेल्या कंपन्यांना मुक्त करण्याचा अधिकार त्या दुरुस्तीमुळें सरकारास मिळणार आहे. हे निर्बंध विदेशी कंपन्यांनीं (भारत सरकारशीं त्यांनीं केलेल्या करारानुसार) भारतांत कंपन्या स्थापन करण्याचे आड येत असल्यामुळें, ते दूर करणें आवश्यक झालें आहे. भारतांत स्थापन होणाऱ्या कंपन्या व होल्डिंग कंपन्या ह्यांचेमध्यें घनिष्ट संबंध रहाणें विदेशी होल्डिंग कंपन्यांना आवश्यक वाटत आहे. हितसंबंधीं डायरेक्टरांनीं मत देण्यावर निर्बंध असलेलें ९१-ब हें कलम आहे.

### कुजून पडलेल्या ठेवी

अमेरिकेंतील बँकांतून २३,२९,६७८ खातेदारांच्या खात्यांत पांच कोटी डॉलर्स एवढी रकम पडून आहे. ह्या खातेदारांचा पत्ता नाहीं. ही रकम सरकारजमा करतां यावी, अशा दृष्टीनें कायदा करण्याचा प्रयत्न केला जात आहे.


दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. | ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. | ३,९९,३८५ |

एकूण खेळतें भांडवल ६३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. वा. वाळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई, स्थापन १९११

तारेचा पत्ता : फार्मर बँक टे. नं. २५८६१ | पोस्ट बॉक्स नं. ४७२

चेअरमनः-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. | ४८,८५,२०० |
| गंगाजळी फंड | रु. | ३९,४८,७०० |
| ठेवी | रु. | ६,९२,८४,९०० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,८०,४९,८०० |

१५ जिल्ह्यांत ६२ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.